वृत्तपत्राचे नांव - सुराज्य
दिनांक - 23/9/2016

## ▶▶ सोलापूर विद्यापीठात मानवी हक्कांबाबत कार्यशाळेचे उद्घाटन

# विश्वबंधुत्वाचा विचार जोपासा

### न्यायमूर्ती एस. आर. बन्नूरमठ यांचे आवाहन

✔ सोलापूर/प्रतिनिधी

जागतिकीकरणाच्या आजच्या कालखंडात लोक अधिकाधिक संकुचित व स्वकेंद्रित विचार करीत आहेत. अशा काळात मानवतेवरील आपला विश्वास दृढ करून, विश्वबंधुत्त्वाचा विचार जोपासत, इतरांच्याही मानवी हक्कांची जपणूक आपण केली पाहिजे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस.आर. बन्नूरमठ (सेवानिवृत्त न्यायमूर्ती केरळ उच्च न्यायालय) यांनी केले.

सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्र संकुलाच्या वतीने विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात दि.२२ व २३ सप्टेंबर हे दोन दिवस ह्यूमन राईटस अॅन्ड ह्यूमनायजिंग सोसायटीज या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा एन.एन. मालदार होते. या प्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम.ए.सईद (सेवानिवृत्त प्रधान सचिव विधी व न्याय विभाग) व भगवंतराव मोरे (आयपीएस), कुलसचिव डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा, सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. ई.एन. अशोककुमार, समन्वयक डॉ. माया पाटील व डॉ.प्रकाश व्हनकडे उपस्थित होते. सभागृहात हैदराबादच्या केंद्रीय विद्यापीठातील प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दिन, म्हैसूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. मुजफ्फर असादी, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके या चर्चासत्रातील वक्त्यांसह बी.सी.यु.डी.चे संचालक प्राचार्य आर. वाय. पाटील, संचालक, अध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.



उद्घाटनाप्रसंगी एस. आर. बन्नूरमठ, कुलगुरु एन. एन. मालदार, अशोक कुमार, माया पाटील व मान्यवर.

### न्याय मिळवून देण्याचे आयोगाचे काम

२०१३ पासून राज्य मानवी हक्क आयोगाचे कार्य सुरू आहे. या माध्यमातून अनेकांना न्याय मिळवून देता आले याचे आम्हाला समाधान आहे. सार्वजनिक प्राधिकरणात कार्य करणाऱ्या व्यक्ती मानवी हक्क उल्लंघनाच्या तक्रारींबाबत योग्य कार्यवाही करत नसतील तर अशा व्यक्ती व प्राधिकरणावर कारवाई करून सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम आयोग करतो. आयोगाकडे आलेल्या प्रकरणे निकाली काढताना आम्ही अर्जदाराकडून कोणतेही शुल्क आकारत नाही. मानवी हक्कांचे उल्लंघन कोठे होत असेल तर यासंदर्भात आयोगाकडे कोणीही माहिती देऊ शकते. गरज पडल्यास आयोग स्वतः होऊन काही प्रकरणात कारवाई करू शकते.

- न्या. बन्नूरमठ

कुलगुरू प्रा. एन.एन. मालदार म्हणाले की, आपण आपल्या हक्कांबाबत जेवढे जागरूक असतो तेवढाच इतरांच्याही मानवी हक्कांचा विचार करून, त्यानुसार आपल्या वागणुकीत बदल केले पाहिजेत.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले. सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक प्रा. ई.एन. अशोककुमार यांनी प्रास्ताविकात या राष्ट्रीय चर्चासत्राच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

डॉ. माया पाटील यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला, डॉ.प्रकाश व्हनकडे आभार प्रदर्शन केले. भासके सूत्रसंचालन अंबादास भासके व तेजस्विनी कांबळे यांनी केले.